928

पश्चिम खान्देश भगिनी सेवा मंडळाचे

# कला, वाणिज्य व बी.सी.ए. महिला महाविद्यालय

(एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई शी संलग्नीत)

**(NAAC Accredited and Certified by ISO)**


कमलाबाई अजमेरा नगर, विद्यानगरी, देवपूर, धुळे-५.

फोन व फॅक्स – ०२५६२–२७२९४९

E-mail - prinwkbs@rediffmail.com, Website - www.wkbsmwomencollegedhule.org


## माहिती पत्रक – २०१६–२०१७



S.N.D.T. WOMEN'S UNIVERSITY MUMBAI 20

**The First Choice of New Age Women**

# MOTTO

**"An Enlightened Women is a source of Intinite Strength"**

## VISION

SNDT Women's University is visualized as a world class university that continually responds to the development and application of knowledge. The purpose of such engagement is to create an inclusive society that promotes and protects the dignity, equality, social justice and human rights for all, with special emphasis on empowerment of Women.

# स्वागत

प.खा.भ. सेवा मंडळ संचलित कला, वाणिज्य व बीसीए, कनिष्ठ व व्यावसायिक अभ्यासक्रम महिला महाविद्यालयात आपणा सर्वांचे संस्था व महिला महाविद्यालयातर्फे हार्दीक स्वागत !

आपल्या संस्थेचा, महाविद्यालयाचा लौकिक सर्वत्र आहे. या लौकिकात भर घालण्याची जबाबदारी आता आपली पण आहे. कारण या लौकिका मागे दिवंगत कमलाताई अजमेरा (माजी राज्यमंत्री) यांची निकोप शैक्षणिक दृष्टी आणि आपल्या सारख्या विद्यार्थिनींचे परिश्रम आहेत.

धुळे शहरात महिलांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट साधणारे हे एकमेव महिला महाविद्यालय एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाशी संलग्नीत असून महिला सबलीकरण दृढ करणारे आहे. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण असणारे हे महाविद्यालय आहे. शैक्षणिक विकास साधण्यासाठी आपण आपला प्रवेश निश्चित करा. भविष्याची वाटचाल यशस्वी करण्यासाठी आपणा सर्वांना हार्दीक शुभेच्छा ! धन्यवाद !

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- नियमीत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थिनींचा सर्वांगिण विकास व्हावा या दृष्टीने विद्यापीठ अनुदान आयोगाने स्त्री अभ्यास केंद्र मंजुर केलेले आहे.
- अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थिनींच्या सर्वांगिण विकासासाठी विद्यापीठ अनुदान आयोगमार्फत रेमीडीअल कोचिंग कोर्स, इंट्री इन सर्व्हिसेस, शॉर्ट टर्म कोर्सेस इ. अभ्यासक्रम २०१२-१३ या वर्षापासून चालविले जातात.
- अंध व अपंग प्रवेशित विद्यार्थिनींसाठी लिफ्टची खास सोय करण्यात आली आहे.
- महाविद्यालयातील सर्व विभागांना अखंड विद्युत पुरवठा मिळावा यासाठी जनरेटरची सुविधा पुरविण्यात आली आहे.
- महाविद्यालयात फक्त मुलींनाच प्रवेश दिला जातो.
- महाविद्यालयातील सर्व विभागात अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळते. महाविद्यालयातील प्राध्यापक हे पीएच.डी./एम.फील व नेट/सेट धारक.
- महाविद्यालयात सुसज्ज वातानुकुलीत अशा ३ संगणक प्रयोगशाळा.
- महाविद्यालयात सुसज्ज असे ग्रंथालय आहे ज्यात अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विविध स्पर्धा परीक्षा, करिअर डेव्हलपमेंट प्रोग्राम तसेच विविध विषयांवरील पुस्तके, मासिके, जर्नल्स उपलब्ध आहेत.
- बाहेरील भागातील विद्यार्थिनींसाठी खास वसतीगृहाची तसेच बसची सोय. एकुण १०० जागे पैकी ७० जागा या फक्त प्रवेशीत विद्यार्थिनींसाठी राखीव तसेच निवास व जेवणाची सोय.
- एससी/एसटी/एनटी/ओबीसी/एसबीसी संवर्गातील विद्यार्थीनींसाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती / फी सवलत योजना.

## महाविद्यालयातील उपक्रम

- आमच्या महाविद्यालयाचे वातावरण समाजामध्ये दृढ विश्वास निर्माण करणारे आहे. महाविद्यालयात मुलींच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांना समाजात आत्मविश्वासाने सन्मानाने उभे रहावे हे सुद्धा शिकविले जाते. महाविद्यालयात पदवी बरोबर पदव्युत्तर तसेच इतर सर्टिफिकेट डिप्लोमा करण्याची सोय.
- महाविद्यालयात विविध विषयांवरील चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदा, सहली आणि सांस्कृतिक कार्यक्रम यासारख्या विद्यार्थीभिमुख कार्यक्रमांद्वारे विद्यार्थिनींचा विकास साधला जातो.
- विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अकराव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत विविध उपक्रमांना मान्यता.
- समाजात निर्माण होणाऱ्या नैसर्गिक / अनैसर्गिक आपत्तींना महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी वर्ग व विद्यार्थिनींनी मिळून आर्थिक मदत केली जाते.
- १० फेब्रुवारी या दिवशी संस्थापक अध्यक्ष कै. कमलाबाई अजमेरा यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम राबविले जातात.
- २ ऑक्टोबर या दिवशी महात्मा गांधी जयंती निमित्त श्रमदानाचा कार्यक्रम.
- १४ एप्रिल या दिवशी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माल्यार्पण व चर्चासत्राचे आयोजन केले जाते.
- **एन.सी.सी., एन.एस.एस., क्रीडा** यासारख्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये अनुशासन, सामाजिक जाणिवा, व्यक्तिमत्व विकास, महिला सबलीकरण व शारीरिक क्षमता यांची जागृती करण्यासाठी प्रयत्न केले जातात.
- महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रातील विविध खेळात नाव कमावले आहे. दरवर्षी विद्यार्थिनी या विद्यापीठ / राज्य / राष्ट्रीय स्तरावर विविध खेळांमध्ये यश मिळवितात.
- बी.सी.ए. या पदवी अभ्यासक्रमा नंतर पद्व्युत्तर अभ्यासक्रमाची एम.सी.एम.ची सोय असुन त्यामार्फत व्यवसायभिमुख अभ्यासक्रम विद्यार्थिनींना नोकरी / व्यवसायाच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देतात.
- कौन्सिलींग सेंटर, विशाखा रॅगिंग समिती
- विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयाकडुन अल्प दरात सॅनिटरी नॅपकिनची सुविधा उपलब्ध.
- महिला दक्षता व तक्रार निवारण सिक्युरिटी सेल
- सूचना-पेटी, विद्यार्थी-शिक्षक-पालक समिती, माजी विद्यार्थिनी समिती, मेळावा मार्फत विद्यार्थी व पालक यांच्या अडचणी समजुन घेतल्या जातात.
- महाविद्यालयात दरवर्षी यशस्वी विद्यार्थिनींना तसेच विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनींना बक्षीस देवून गौरविण्यात येते. महाविद्यालयात स्वयंसिद्धा हा पुरस्कार महाविद्यालयातील आदर्श विद्यार्थिनीला दिला जातो.

## प्रवेशासंबंधी नियम व अटी

ऑन लाईन प्रवेश घेण्यापूर्वी माहिती पत्रकातील संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचावी. माहिती पत्रकासोबतचा छापील प्रवेश अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह भरुन दिल्यावरच प्रवेश दिला जाईल. सर्व कला शाखेची प्रवेश प्रक्रिया निकाल लागल्यानंतर लगेच सुरु होते. संबंधीत शाखेस मर्यादीत जागा असल्याने त्वरा करुन आपला प्रवेश निश्चित करावा. महाविद्यालयातील कला, बी.सी.ए. व एम.ए. या विद्याशाखांना विद्यापीठाने सत्र पध्दती सुरु केलेली आहे. तसेच शासनाच्या आरक्षणानुसार राखीव प्रवेश देण्यात येतील.

- महाविद्यालयात प्रवेश घेतांना पुढील गोष्टींची पूर्तता करावी.

१. प्रवेश अर्जावर करंट पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक आहे.
२. शाळा सोडल्याचा मुळ दाखला व तीन सत्यप्रती.
३. मागील परीक्षेच्या गुणपत्रकाच्या तीन सत्यप्रती.
४. एससी/एसटी/एनटी/ओबीसी/एसबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांनी जातीच्या प्रमाणपत्राच्या तीन सत्यप्रती.
५. प्रथम वर्ष पदवी वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता मंजूर केल्याशिवाय प्रवेश कायम समजला जाणार नाही.
६. **Eligibility** चा प्रिंटेड फॉर्म महाविद्यालय सुरु झाल्यानंतर कार्यालयाकडून विद्यार्थ्यांना मिळेल. तो तपासून त्यावर स्वत:ची सही करुन परत कार्यालयाकडे जमा करावा.
७. प्रथम वर्ष कला व बी.सी.ए. अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण/ए.टी.के.टी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षास प्रवेश मिळेल. **प्रथम वर्ष** उत्तीर्ण झाल्याशिवाय तृतिय वर्षात प्रवेश मिळणार नाही.
८. द्वितीय व तृतीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अर्जासोबत मागील सर्व सत्र परीक्षांचे गुणपत्रकांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
९. प्रवेश अर्जावर विषयांची नावे **विचारपूर्वक नमुद करावेत.** नंतर विषय बदलता येणार नाही. **अपवादात्मक** परिस्थितीत प्राचार्यांच्या परवानगीने रु. १०० फी भरुन विषय बदलुन घेता येईल.
१०. प्रवेश घेतल्यापासून ७ दिवसाच्या आत प्रवेश रद्द केल्यास १०%, १५ दिवसाच्या आत प्रवेश रद्द केल्यास २५% फी कपात केली जाईल. १५ दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास अनामत रकमेशिवाय इतर कोणतीही फी परत केली जाणार नाही. अनामत रक्कम एका वर्षाच्या आतच परत मिळेल.
११. प्रवेश घेतांना दाखल केलेली कागदपत्रे खोटी /बनावट आढळल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.
१२. विद्यापीठ नियमानुसार शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात एकूण हजेरी ८०% असणे आवश्यक आहे. अन्यथा कोणत्याही परीक्षेस बसू दिले जाणार नाही.
१३. कोणतेही कारण न सांगता कोणाचाही अर्ज नाकारण्याचा प्राचार्यांना पूर्णपणे अधिकार आहे. एकदा अर्ज नाकारल्यानंतर त्यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार अथवा प्रत्यक्ष बोलणी केली जाणार नाही व कोणत्याही विद्यर्थिनीस त्याचा हक्क म्हणून महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाही.
१४. भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थिनींनी आपले फॉर्म **मुदतीत** ऑन लाईन भरून त्याची प्रत योग्य त्या कागदपत्रासह महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे. यासाठी विद्यार्थिनींनी बँक ऑफ महाराष्ट्र, देवपूर शाखा या राष्ट्रीयकृत बँकेत आपले खाते उघडणे आवश्यक आहे.

## टी.सी. संबंधी विशेष सूचना

स्थानांतर प्रमाणपत्र शुल्क (टी.सी./एल.सी. फी) पुढीलप्रमाणे.

अ) महाविद्यालय सोडल्यानंतर सहा महिन्यापर्यंत रु.२५/–, सहा महिन्यानंतर परंतु तीन वर्षाच्या आत रु.५०/– तीन वर्षानंतर रु.१००/– व पाच वर्षानंतर रु.२००/– फी आकारली जाईल. एकदा महाविद्यालयातून टी.सी., एल.सी. काढल्यानंतर ते काळजीपूर्वक जपून ठेवावे. हरवल्याच्या सबबीवर कुठल्याही परिस्थितीत दुसरे टी.सी. दिले जाणार नाही.

ब) इतर कोणत्याही प्रकारच्या प्रमाणपत्रासाठी रु. ५/– शुल्क आकारले जाईल.

## शिस्तीबाबत महत्वाची सूचना

- महाविद्यालयाच्या आवारात ओळखपत्र (**I-Card**) गळ्यात असणे अनिवार्य आहे.
- महाविद्यालयात कुणीही मोबाईल आणु नये. मोबाईल आढळल्यास रु.१००/– दंड आकारण्यात येईल.
- तासिका नसतांना महाविद्यालयाच्या आवारात / सायकल स्टँडवर न थांबता ग्रंथालयात वाचन कक्षात अभ्यास करावा.
- महाविद्यालयात येतांना मौल्यवान वस्तु, पैसे आणु नयेत. हरविल्यास महाविद्यालय त्याची कोणतीही दखल घेणार नाही.
- आपण महाविद्यालयात आणलेले वाहन स्वत:च्या जबाबदारीवर आणावे. वाहन चोरीस गेल्यास किंवा नुकसान झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.
- मुलींचे महाविद्यालय असल्याने महाविद्यालयात शिस्त राखावी.

## महाविद्यालयात सुरु असलेले विविध अभ्यासक्रम

### इ.११वी पासून ते पदव्युत्तर वर्गापर्यंत

- **कनिष्ठ महाविद्यालय (कला)**


  (१) इ.११वी इंग्रजी, मराठी, पर्यावरण हे सक्तीचे विषय, ऐच्छीक विषय – ४
  (१) समाजशास्त्र/राज्यशास्त्र (२) हिंदी/भुगोल (३) अर्थशास्त्र (४) इतिहास/संरक्षणशास्त्र

  (२) इ.१२वी इंग्रजी, मराठी, पर्यावरण हे सक्तीचे ऐच्छीक विषय – ४
  (१) समाजशास्त्र/राज्यशास्त्र (२) हिंदी (३) इतिहास/संरक्षणशास्त्र (४) अर्थशास्त्र)


  (३) इ.११वी व १२वी ला शारीरिक शिक्षण हा विषय सक्तीचा आहे.
- उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम (१०+२)
- बी.ए. (मुख्य विषय – मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र)
- बी.सी.ए. (बॅचलर ऑफ कॉम्प्युटर अप्लीकेशन)
- एम. ए. भाग १ व २ (+) सत्र १ ते ४ – सत्र ४ मध्ये २०० गुणाचा लघुशोध प्रबंध तयार करणे आवश्यक आहे. तसेच २०० गुण Internship साठी दिले जातात. (हिंदी, इतिहास, समाजशास्त्र)
- बी.लिब. व माहितीशास्त्र (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत)



महाविद्यालयाचे महिलासाठी भव्य वसतीगृह



बी.सी.ए. शाखेची अद्ययावत वातानुकुलीत
सुसज्ज संगणक कक्ष




विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयीन बसची सुविधा



विद्यार्थीनींच्या चांगल्या आरोग्यासाठी जिमची खास सुविधा